प्रधानमंत्री पीक विमा योजना रब्बी हंगाम सन २०१८ साठी राज्य शासनाच्या हिश्याची पिक विमा हप्ता अनुदानापोटी रु.७०.०० कोटी इतकी रक्कम वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

शासन निर्णय क्रमांकः प्रपिवियो-२०१८/प्र.क्र.५२/११ अे,

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख: २० मार्च, २०१९

वाचा -

१. शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९ /अर्थ-३, दि.०२.०४.२०१८
२. कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र. प्रपिवियो-२०१८/प्र.क्र.५२/११- अे, दि.२४.०५.२०१८
३. कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र. प्रपिवियो-२०१८/प्र.क्र.५२/११- अे, दि.१३.०६.२०१८
४. कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र. प्रपिवियो-२०१७/प्र.क्र.२१८/११- अे, दि.०५.०७.२०१८
५. कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र. प्रपिवियो-२०१७/प्र.क्र.१६५/११- अे, दि.०४.१०.२०१८
६. कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र. प्रपिवियो-२०१७/प्र.क्र.२१८/११- अे, दि.२९.१०.२०१८
७. कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र. प्रपिवियो-२०१८/प्र.क्र.१८०/११- अे, दि.०६.११.२०१८
८. कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र. प्रपिवियो-२०१८/प्र.क्र.२५०/११- अे, दि.१६.११.२०१८
९. कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र. प्रपिवियो-२०१८/प्र.क्र.५२/११- अे, दि.२८.११.२०१८
१०.कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र. प्रपिवियो-२०१७/प्र.क्र.२१८/११- अे, दि.१८.१२.२०१८
११. कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र. प्रपिवियो-२०१८/प्र.क्र.५२/११- अे, दि.०१.०१.२०१९
१२.शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.पूरक-२०१९/प्र.क्र.४१ /अर्थ-३, दि.०८.०३.२०१९
१३.कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र. कृषिआ/सां.८/पिवियो/१६८/२०१९, दि.१५.०३.२०१९

प्रस्तावना :-

प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप २०१८ मध्ये राज्यात भारतीय कृषि विमा कंपनी, ओरिएन्टल जनरल इंशुरन्स कंपनी, आयसीआयसीआय लोम्बार्ड कंपनी व इफको टोकियो जनरल इंशुरन्स कंपनी या ४ विमा कंपन्यांमार्फत दि.२४.०५.२०१८ व दि.१३.०६.२०१८ च्या शासन निर्णयान्वये राबविण्यात येत आहे. तसेच सदर योजना रब्बी हंगाम २०१८ मध्ये फ्युचर जनरली जनरल इंशुरन्स कं. लि., बजाज अलियांन्झ जनरल इंशुरन्स कं. लि. तसेच भारती एक्सा जनरल इंशुरन्स कं.लि. या ३ विमा कंपन्यांमार्फत दि.०६.११.२०१८ च्या शासन निर्णयान्वये राबविण्यात येत आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत सन २०१८-१९ या वित्तीय वर्षासाठी (२४०१ A६६४) या लेखाशिर्षाखाली रु.१६५३.८० कोटी इतकी रक्कम अर्थसंकल्पित करण्यात आलेली आहे. सदर रु.१६५३.८० कोटी इतकी रक्कम अद्यापपर्यंत संपूर्णपणे वितरीत करण्यात आली असून, आता सुधारीत अंदाजाव्दारे मंजूर करण्यात आलेली, रब्बी हंगाम २०१८ साठी राज्य शासन हिस्सा पिक विमा हप्ता अनुदानाची दुसऱ्या हफ्त्यापोटी अनुज्ञेय असलेली रु.७०.०० कोटी इतकी रक्कम कृषि आयुक्तालयाने केलेल्या विनंतीनुसार वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

प्रधानमंत्री पीक विमा योजना सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पित तरतूदीतून उपरोक्तप्रमाणे संपूर्ण रक्कम अद्यापपर्यंत वितरीत करण्यात आली असून, आता सुधारीत अंदाजाव्दारे मंजूर करण्यात आलेली रु.७०.०० कोटी इतकी रक्कम रब्बी हंगाम २०१८ साठी पिक विमा हप्ता अनुदानापोटी राज्य शासन हिश्याच्या स्वरुपात वितरीत करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. केंद्र शासनाने विहित केलेल्या प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या सुधारीत मार्गदर्शक सुचनांनुसार प्रस्तुतचा खर्च करण्यात यावा, तसेच प्रस्तुत बाबींवर होणारा खर्च खालील लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ करिता मंजूर केलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीतून भागविण्यात यावा :-

मागणी क्र. डी -३
२४०१ - पीक संवर्धन
११०, पीक विमा (००) (०८) प्रधानमंत्री पिक विमा योजनेंतर्गत विमा हप्त्यासाठी अर्थसहाय्य राज्य हिस्सा (२४०१ A ६६४) योजनेतर

३. प्रस्तुत प्रयोजनार्थ सहायक संचालक (लेखा), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी तर कृषि संचालक (वि.प्र.), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. प्रस्तुत शासन निर्णय वित्त विभाग परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.४२/ अर्थ-३, दि.०८.०३.२०१९ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. प्रस्तूत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२०१३१२३९६४०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Neeta Eknath Shinde

Digitally signed by Neeta Eknath Shinde
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Agriculture and ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=f2bffd6992498e56663024368c72b33364cfb066d53682c53a425e54d187a7c1, serialNumber=f325d659f47933958aa2d98f394db95f94be57548776492ba36e77ea1c4aa53b, cn=Neeta Eknath Shinde
Date: 2019.03.20 13:23:20 +05'30'

(निता शिंदे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२
२. मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई -३२
३. सचिव (कृषि) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२
४. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
५. उप सचिव (११-अे /२-अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक
६. संचालक (वि.प्र.), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
७. मुख्य सांख्यिक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

८. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
९. सहाय्यक संचालक (लेखा), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१०.जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
११.महालेखापाल, महाराष्ट्र -१/२, (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
१२.वित्त विभाग (व्यय-१), मंत्रालय, मुंबई- ३२
१३.कक्ष अधिकारी (२- अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
१४.विभागीय व्यवस्थापक, भारतीय कृषि विमा कंपनी, स्टॉक एक्सचेंज टॉवर्स, २० वा मजला, दलाल स्ट्रीट,फोर्ट, मुंबई-४०० ०२३
१५.निवड नस्ती (कार्यासन ११-अे).